# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट १९७-२३ दिनांक २०/०६/२०२३

**अल्पवयीन पिडीत मुलीस व तिचेवर अत्याचार करणा-या आरोपीतास पंजाब राज्यातुन जवळपास ४ वर्षानंतर ताब्यात घेण्यास वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/१०/२०२० रोजी १९.३० वा. चे. दरम्यान मोर्यानाका सातिवली, समतानगर, वसई पुर्व येथुन अज्ञात आरोपीत याने गुन्हयातील अल्पवयीन मुलीस तिच्या अज्ञानाचा फायदा घेवुन तिस कशाचे तरी अमिष दाखवुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेलेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने अज्ञात आरोपीताविरुध्द वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. I ८७४/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान गुन्हयातील अपहरीत अल्पवयीन मुलगी हीस आरोपीत नामे राजा रामबीर यादव मुळ रा. इंदीरा नगर, ता. सदर, जि. फिरोझाबाद राज्य-उत्तर प्रदेश याने तिचा अज्ञानाचा फायदा घेवुन तिस कशाचे तरी अमिष दाखवुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेलेबाबत निष्पन्न झाले होते. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस पथक हे वारवांर आरोपीत याचे मुळ गावी जावुन आरोपीत व अपहरीत मुलीचा शोध घेत होते. परंतु आरोपीत व यातील अपहरीत अल्पवयीन मुलीबाबत काहीएक माहिती मिळुन येत नव्हती व आरोपीत हा गुन्हा केल्यापासुन त्याचे नातेवाईक अथवा मित्र मंडळी यांचे कोणाचेही संपर्कात नसल्याने गुन्हयाची उकल होत नव्हती. गुन्हयातील अपहरीत मुलगी व आरोपीत हे जवळपास गेले ४ वर्षापासुन मिळुन येत नव्हते.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे यातील आरोपीत हा त्याचा भाऊ सन्नी यादव मुळ रा. फिरोजाबाद, उत्तरप्रदेश याचे संपर्कात असलेबाबत माहिती प्राप्त झाल्याने गुन्हयाचे तपासादरम्यान प्रथमदर्शनी आरोपीत याचा भाऊ सन्नी यादव यास त्याचे मुळ गावी जावुन ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करणे गरजेचे असल्याने वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक यांनी फिरोजाबाद राज्य उत्तरप्रदेश येथे जावुन गुन्हयातील आरोपीत याचा भाऊ सन्नी रामबीर यादव यास ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचा तपास करता त्याने त्याचा भाऊ आरोपीत राजा यादव व गुन्हयातील अपहरीत अल्पवयीन मुलगी असे कामासाठी गाव-अबोहर, जिल्हा-फाजील्का, राज्य-पंजाब येथे गेलेले असलेबाबत माहिती प्राप्त झाल्याने लागलीच पथकाने आरोपीत याचा भाऊ यास सोबत घेवुन त्याने दिलेल्या माहितीचे आधारे राज्य-पंजाब येथे जावुन आरोपीत याचा शोध घेतला असता यातील आरोपीत नामे राजा रामबीर यादव, सध्या रा. धरमनगरी, अबोहर, जि. फाजील्का, राज्य-पंजाब हा यातील अपहरीत अल्पवयीन मुलीसह तेथे वास्तव्य करीत असताना मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. अभिजीत गढरी, विनायक राऊत, म.पो.अंम. प्रियंका पवार यांनी केली आहे.




----ooo----